व्यंकटेश महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

" राष्ट्रीय सेवा योजनेतून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मध्ये मानवता, समाजसेवा, राष्ट्रसेवा व राष्ट्रभक्ती रुजवण्यासाठी प्रयत्न केले जातात. महाविद्यालयीन स्तराव रुजवलेले हेच संस्कार पुढे त्यांना एक चांगला भारतीय नागरिक म्हणून जगण्यासाठी मदत करतात. म्हणूनच महाविद्यालयीन जीवनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये काम करणे म्हणजे एक सुवर्णसंधीच असते." असे मत श्री. श्रीकांतजी चंगेडिया यांनी मांडले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या टाकवडे येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत बुधवार दिनांक 22/1/2025 ते मंगळवार दिनांक 28/ 1/ 2025 या कालावधीत विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये विविध व्याख्यानमाला आयोजित करून प्रबोधन करण्यात आले. त्याचबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन ,स्वच्छता अभियान ,आरोग्य ,मतदान जनजागृती , यासारख्या विविध प्रबोधनात्मक रॅली काढण्यात आल्या.तसेच गावातील विविध परिसरात स्वच्छता अभियान राबवून गावाच्या विकासामध्ये हातभार लावण्यात आला. शाळेचा परिसर ,ग्रामपंचायतचा परिसर, गाव तळ्याचा परिसर ,स्मशानभूमी इत्यादी परिसराची स्वच्छता करून गावाच्या सौंदर्यात भर टाकण्यात आली.या शिबिराचा समारोप समारंभ आज दिनांक 28/ 1/ 2025 रोजी डॉ. सा.रे.पाटील पाणीपुरवठा केंद्र जांभळी टाकवडे येथे घेण्यात आला त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. श्रीकांतजी चंगेडिया ट्रस्टी श्री ना.बा.एज्युकेशन सोसायटी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही. ए. माने ,त्याचबरोबर पाणीपुरवठा संस्थेचे सर्व पदाधिकारी ,संचालक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ.डी. एस. कांबळे यांनी मांडले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.ए.आय. बाणदार यांनी मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आरती कदम व कु.श्रेया घाडगे हिने केले.


स्थापना – १९८३
(नॅक मानांकन 'अ')
श्री ना. बा. एज्युकेशन सोसायटीचे,
श्री व्यंकटेश महाविद्यालय,
इचलकरंजी
राष्ट्रीय सेवा योजना
Not Me But You
विशेष श्रमसंस्कार शिबीर